# मेट्रो-३च्या १.२४ किलोमीटर अंतराचे भुयारीकरण पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गिकेवरील भुयारीकरणाच्या तेराव्या टप्प्याचे काम पूर्ण झाले. विधान भवन मेट्रो स्टेशनजवळ सूर्या २ हे टनेल बोअरिंग मशीन(टीबीएम) शुक्रवारी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास भुयारातून बाहेर आले. या यंत्राद्वारे कफ परेड ते विधान भवन स्थानक या १.२४ किलोमीटर अंतराचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

भुयारीकरणाच्या तेराव्या टप्प्यासाठी एकूण ८३८ रिंग्सचा वापर करण्यात आला होता. या भुयाराच्या कामामुळे पॅकेज १ मधील ५.८९ किलोमीटरपैकी २.४८ इतके भुयारीकरण पूर्ण झाल्याची माहिती मिळते. त्याशिवाय, चर्चगेट स्थानकाबाहेर मेट्रोचे काम सुरू असून, त्या ठिकाणी शुक्रवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास छोटासा स्फोट करण्यात आला होता. त्यावेळी सर्व वाहने, पादचाऱ्यांना थांबवण्यात आले होते. खोदकाम करताना लागलेला कठीण खडक यंत्राद्वारे फोडणे कठीण होते. त्यावेळी लहान स्वरूपाचा नियंत्रित स्फोट करण्यात आला होता.

**● कफ परेड स्थानकापासून या भुयारी टप्प्याची सुरुवात झाली असून २०५ दिवसांत हा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. कफ परेड येथे खोदलेल्या विवरात ६०० मेट्रिक टन वजनाचे सूर्या २ हे टीबीएम उतरवण्यात आले होते . त्याची लांबी ९५ मीटर इतकी आहे . दिवसाला ७ रिंग्ज या वेगाने भुयारीकरणाचे काम या यंत्राद्वारे करण्यात आले आहे. तब्बल २०५ दिवसांनंतर हे भुयार शुक्रवारी सकाळी पूर्ण झाले.**